# स्वामी विवेकानंदांचे
# खरे स्वरूप

**डॉ. सुभाष के. देसाई**
एम.ए., पीएच.डी.

**सिंहवाणी प्रकाशन, कोल्हापूर**
**२०१६**

अर्पण

**'बहुजन हिताय बहुजन सुखाय'**
**कार्य करणाऱ्या सर्वांना**

---

**स्वामी विवेकानंदांचे खरे स्वरूप**
लेखक : डॉ. सुभाष के. देसाई

**संकेत स्थळ** :
www.subhashkdesai.com
**E-mail :**
drsubhashdesai@gmail.com
Cell : 09423039929

**प्रथमावृत्ती**
१५ ऑगस्ट, २०१६

**मुद्रक-प्रकाशक**
सिंहवाणी प्रिंटर्स, पब्लिशर्स
११, ब, शिवाजी स्टेडियम,
कोल्हापूर - ४१६०१२

सर्व हक्क : लेखक

मूल्य : रु. ३०/-

# मनोगत

होय ! आम्ही कोट्यवधी लोक हिंदू म्हणून जन्माला आलो; पण आजपर्यंत धर्म आणि तत्त्वज्ञानातला फरक आम्हांला समजलाच नाही. त्यामुळे हिंदुधर्मीय म्हणून अभिमान बाळगायचा का भारतीय तत्त्वज्ञानाचा अभिमान बाळगायचा, याबाबत मनात संभ्रमच राहिला. हिंदू नावचा धर्म आहे की नाही, असा प्रश्न कोणी विचारू शकेल; पण भारतीय तत्त्वज्ञान आहे की नाही, या प्रश्नाला ठाम होकारार्थी उत्तर येईल.

ज्याप्रमाणे विज्ञान आणि तंत्रज्ञान यात फरक आहे आणि त्यात परस्पर नाते आहे, त्याप्रमाणे तत्त्वज्ञान आणि धर्म यांचे नाते आहे आणि दोहोत फरकही आहे. विज्ञान हा सैद्धांतिक भाग आहे, तर तंत्रज्ञान हे त्याची व्यवहार्य बाजू आहे. त्याप्रमाणे तत्त्वज्ञान हा सैद्धान्तिक भाग आणि धर्म ही व्यवहार्य बाजू आहे. हिंदुधर्माचे खरे स्वरूप म्हणजे भारतीय तत्त्वज्ञानच आहे. धर्माचार्य म्हणतात चार वेद, अठरा पुराणे, दोन शास्त्रे म्हणजे सर्वस्व. त्याची कोणी चिकित्सा करायची नसते. ते अनादि अनंत आहेत, देवनिर्मित आहेत. यावर कोणी प्रश्न उपस्थित करेल, तर तो पापी, तो पाखंडी मग त्याला देहदंडापर्यंत शिक्षा आणि तो वध! खून नव्हे.

पण, तत्त्वज्ञानाची बौद्धिक चिरफाड करता येते. त्याची चिकित्सा करता येते. सारे धर्म शेवटी एकाच तत्त्वाचा शोध घेतात. जशा साऱ्या नद्या शेवटी एकाच सागराला मिळतात, त्याप्रमाणे भाषा वेगळी, प्रांत वेगळा, देश वेगळा, धर्म वेगळा, पंथ वेगळा, जात वेगळी असली तरीही सारे जण त्या तत्त्वाचाच शोध घेतात. पण, धर्माचे व्यासपीठ अहिंसेचा उद्घोष करता करता धर्मांध होऊन रक्तरंजित बनते.

भारतीय तत्त्वज्ञानाचा हिंदुधर्म हा फार अल्पसा भाग आहे. त्यात षड्दर्शने येतात त्यांपैकी निम्मी नास्तिक आहेत. जैन, बुद्ध, सांख्य, चार्वाक अशी दर्शने ईश्वर न मानणारी आहेत. त्यामुळे सहाजिकच ती मूर्तिपूजा आणि तदनुषंगाने

कर्मकांड मानीत नाहीत. स्वर्ग व नरक या मानवी कपोलकल्पिते आहेत, असे ते मानतात; तर इतर दर्शने ही ईश्वर मानणारी, मूर्तिपूजा, कर्मकांड मानणारी आहेत. याचा अर्थ भारतीय तत्त्वज्ञान अतिव्यापक, सर्वसमावेशक, सर्वधर्मतत्त्वांना सामावणारे आहे.

भारतीय तत्त्वज्ञान चार खांबांवर आधारलेले आहे. १) मोक्ष २) कर्मसिद्धान्त ३) पुनर्जन्म ४) षड्दर्शने

योग, पूर्वमीमांसा आणि वेदान्त यांनाही दर्शने म्हणतात. वेदान्तात- शंकराचार्यांचे अद्वैत, रामानुजांचे विशिष्टाद्वैत, मध्वाचार्यांचे द्वैत, वल्लभाचार्यांचे शुद्धाद्वैत आणि निंबार्कांचे द्वैतमत विचारात घेतले जाते. तत्त्वज्ञान म्हणजेच संपूर्ण जीवनाचे अथवा अनुभवाचे दर्शन, सृष्टीच्या वास्तविक रूपाचे दर्शन किंवा सत्यासंबंधीचे जे ज्ञान ते तत्त्वज्ञान. तत्त्वज्ञान आपण टाळू शकत नाही. जगताना आपण कोणतातरी जीवनविषयक दृष्टिकोन बाळगतो, कोणतातरी दृष्टिकोन स्वीकारतो. हा दृष्टिकोन किंवा जीवनाविषयक धोरण म्हणजे तत्त्वज्ञान.

अलीकडच्या समाजधारणेत असा दृष्टिकोन किंवा धोरण तत्त्वज्ञानाच्या मजबूत पायावर उभारण्याऐवजी अनेक कर्मकांडांवर, रूढी आणि काल्पनिक धर्मकल्पनांवर आधारले जाते नि मग संपूर्ण समाजाचीच दिशाभूल होते. यासाठी हिंदुधर्माचे खरे स्वरूप समजून घेण्याची आवश्यकता आहे.

त्यासाठी स्वामी विवेकानंदांचे जीवन आणि संदेश फार उपयुक्त आहे. पण, त्यांचे खरेखुरे जीवन आणि विचार यांचे दर्शन होत नाही. काही लोकांनी आपल्या स्वार्थप्रेरित उद्देशांसाठी स्वामीजींचा संदेश मोडतोड करून वापरला. खरे विवेकानंद दडवले. वैश्विक धर्माची मांडणी करणाऱ्या स्वामीजींना सनातनी हिंदुधर्माचा प्रवक्ता बनवले. मग विवेकानंद कसे होते? अमेरिका आणि युरोपमधल्या वृत्तपत्रांनी त्यांच्या केलेल्या नोंदी या अधिकृत आहेत, त्यांची पत्रे अधिकृत आहेत. त्याआधारे खरेखुरे व्यक्तिमत्त्व उभे राहते. 'मी' समाजवादी आहे, असे स्वामीजी का म्हणाले? पहिल्या जागतिक परिषदेत गौतमबुद्ध आणि महावीर या श्रमणपरंपरेचा मी प्रतिनिधी आहे, असे ते का म्हणाले? चातुर्वर्ण्य, मूर्तिपूजा, यज्ञयाग यांचा त्याग केलेला अद्वैताश्रम मायावतीला का स्थापला? अनाथाश्रम, सर्वधर्मीय मुलामुलींसाठी शाळा, वसतिगृह का सुरू केले? प्लेगच्या साथीत स्वत: सेवेसाठी का उतरले नि



बंगालमध्ये दुष्काळग्रस्तांसाठी मठही विकायला का तयार झाले? या प्रश्नांची उत्तरे शोधताना खरे विवेकानंद मिळतात. त्यांचे बंधू डॉ. भूपेंद्रनाथ तुर्कस्थान, ग्रीस येथे सशस्त्र भारतीय सेना स्थापन करतात, लेनिनच्या संपर्कात राहतात, भारतात शेतकरी कामगारासाठी चळवळ उभारतात यावरून बंगालचे हे क्षत्रिय कुटुंब सनातनी नव्हते. हा निष्कर्ष काढता येतो.

◆


## युरोप आणि अमेरिकेतील स्वामी विवेकानंद

(सविस्तर ग्रंथ पृष्ठे : ३००, मूल्य रु. २५०/-)

उपलब्ध : सिंहवाणी प्रकाशन, ११ ब, शिवाजी स्टेडियम, कोल्हापूर




**अमेरिका व युरोपमधील स्वामी विवेकानंद -** स्वामी विवेकानंद हे बंगालचे कायस्थ (क्षत्रिय), पुरोगामी विचारांचे, संन्यास परंपरेमध्ये समुद्र ओलांडणे, अनाथश्रम किंवा शाळा काढणे, दवाखाने चालवणे याबाबतच्या चौकटी त्यांनी मांडल्या. ते हिंदू धर्माचे वा एका विशिष्ट संप्रदायाचे प्रचारक नव्हते. ३९ वर्षाच्या आयुष्यात शेवटची ९ वर्षे त्यांनी प्रचंड काम केले आहे. त्यातील ६/७ वर्षे अमेरिका व युरोपमध्ये त्यांनी काम केले. त्यांचा जवळजवळ दैनंदिन आढावा तेथील वृत्तपत्रांच्या आधारे, स्वामीजींची पत्रे, त्यांना आलेली पत्रे या आधारे घेतला आहे. भारत आणि युरोपमधल्या स्वामीजींच्या भ्रमंतीच्या जागी लेखकाने भेटी दिल्या आहेत. त्यामुळे मराठी साहित्यात स्वामी विवेकानंदांचे हे रूप प्रथमच दिसत आहे.

# मी समाजवादी आहे,
# असे विवेकानंद का म्हणाले?

जगप्रसिद्ध भारतीय तत्त्ववेत्ते 'स्वामी विवेकानंद म्हणजे हिंदुधर्माचे प्रवक्ते', अशी चुकीची प्रतिमा रंगवली गेली आणि आजही शिकागोच्या जागतिक धर्मपरिषदेत विवेकानंद हिंदुधर्माचे प्रतिनिधी म्हणून गेले, असा खोटा प्रचारही केला जातो. त्यांनी स्वत:ला (I am a socialist) मी समाजवादी आहे, असे म्हटले. असे त्यांनी का म्हटले, या प्रश्नाच्या उत्तरासाठी सविस्तर विवेचन करण्याचा हा प्रयत्न आहे. त्यासाठी त्यांच्या घराण्याचा इतिहास, वैचारिक बैठक यांचा मागोवा घेणे गरजेचे आहे.

सिमला येथून दत्त कुटुंब कोलकात्याला १८व्या शतकात आले. त्या घराण्यात विश्वनाथ दत्त जन्माला आले. १८६६मध्ये ते ॲटर्नीशीपची परीक्षा उत्तीर्ण आले. त्यानी धार अँड सन्स नावाची कंपनी स्थापन करून वकिलीचा व्यवसाय सुरू केला. त्यांना बंगाली, संस्कृत, पर्शियन, अरेबिक, उर्दू, हिंदी या भाषा येत. त्यांचे वाचन अफाट होते. १८८२साली त्यांचे 'शिष्टाचार पद्धती' हे पुस्तक प्रसिद्ध झाले.

विश्वनाथ दुर्गाप्रसाद दत्त आणि भुवनेश्वरी देवी यांच्यापोटी नरेन (स्वामी विवेकानंद) यांचा जन्म झाला. स्वर्णमयी ही कन्या व महेंद्रनाथ, आणि भूपेंद्रनाथ ही नरेंद्रांची भावंडेही उभयतांच्या पोटी जन्माला आली. नरेन कुस्ती, बॉक्सिंग, क्रिकेट यात पारंगत होते. ते पाकशास्त्रही चांगले जाणत. त्यांचे उंचेपुरे नि पिळदार शरीर त्यांच्या सुंदर व्यक्तिमत्त्वाची ओळख होती. त्यांचे वक्तृत्वही प्रभावी होते.

त्यांच्या घरी सर्व जातिधर्मांचे लोक येत. त्यामुळे ते कधीच सनातनी, कर्मठ, धार्मिक बनले नाहीत. त्यांनी कधीही जातिभेद पाळला नाही. त्या वेळी जातिभेद समाजात तीव्रतेने पाळला जात असे. वडील वकील असल्याने विविध जातींचे लोक येत. त्यांच्यासाठी वेगवेगळे हुक्के ठेवलेले असत. एकाचा



हुक्का दुसरा ओढत नसे. या प्रथा मोडल्याने काय होते, हे शोधायचे छोट्या नरेनने ठरवले. दिवाणखान्यातील प्रत्येक हुक्का तो ओढत असतानाच वडील दिवाणखान्यात आले. त्यांनी विचारले, ''येथे तू हे काय करतोस?'' त्यावर नरेन म्हणाला, ''पिताजी, मी बघत होतो; जात मोडली तर काय होते? काहीच झाले नाही.'' विश्वनाथबाबू जोरजोरात हसत आपल्या अभ्यासखोलीत निघून गेले. मुलाच्या चिकित्सक वृत्तीचे त्यांना कौतुक वाटले. १८७१मध्ये पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या मेट्रोपॉलिटन इन्स्टिट्युटच्या शाळेत इंग्रजी विभागात नरेंद्रचे नाव घातले. कोलकात्यातील ती सर्वांत प्रसिद्ध शाळा होती. तेथे तो सर्व विषयात प्रथम येत असे. मध्यंतरी वडील रायपूरला सहकुटुंब गेले. पुन्हा १८७९मध्ये कोलकात्यात परतले. प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये नरेंद्रने तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, तर्कशास्त्र हे विषय घेतले. १८८३ मध्ये बी.ए. झाल्यावर कायद्याच्या कोर्सला नाव घातले. पुढे इंग्लंडला बॅरिस्टर पदवीसाठी जाण्याचे योजले; पण वडिलांच्या आकस्मिक निधनामुळे नरेंद्रांचे ते स्वप्न पूर्ण होऊ शकले नाही.

नरेंद्रला ब्राह्मो समाजात बौद्धिक आणि आध्यात्मिक वातावरण लाभले. त्यामुळे निर्गुणनिराकार ईश्वर या कल्पनेचा त्यांच्या मनावर प्रभाव पडला. रवींद्रनाथ टागोरांचे वडील महर्षी देवेंद्रनाथ टागोर, हे त्या वेळी ब्राह्मो समाजाचे ज्येष्ठ नेते होते. त्यांच्याशीही नरेंद्रने चर्चा केली.

वडिलांच्या आकस्मिक निधनामुळे घरच्या सात लोकांची जबाबदारी त्यांच्यावर पडली. १८८६च्या जूनमध्ये मेट्रोपॉलिटिन संस्थेत मुख्याध्यापक म्हणून त्यांची नियुक्ती झाली. रामकृष्ण परमहंस यांचा सहवास त्यांना तीन-चार वर्षे लाभला. १६ ऑगस्ट, १८८६ला परमहंस यांचे कर्करोगामुळे निधन झाले. त्यानंतर नरेंद्रांनी स्वत: संन्याशाची वस्त्रे धारण केली. त्यांच्या काही सहकाऱ्यांनीही संन्यास घेतला. १८८८मध्ये नरेंद्र भारत भ्रमणासाठी बाहेर पडले.

## भंग्याची चिलीम

प्रवासात रस्त्याच्या कडेला एक जण तंबाखू ओढत निवांत बसला होता. चालून थकलेल्या नरेंद्रांनी त्या माणसाकडे हुक्का मागितला. तो माणूस हात जोडून संकोचाने म्हणाला, ''महाराज मी भंगी आहे.'' नरेंद्रांनी हात मागे घेतला नि ते पुढे चालू लागले. त्यांच्या मनात प्रश्न आला. आपण सर्वसंग

परित्याग केला आहे, मग जातिभेद कुठला? चातुर्वर्ण्यात गाडले गेले सारेच मानव. त्याच पावली नरेंद्र परतले नि प्रेमपूर्वक व आग्रहाने हुक्का घेऊन त्यांनी तो आनंदाने ओढला. समतेचा, जातिअंताचा धडा त्यांनी तिथे गिरवला. राजस्थानमध्ये ते एका मुस्लीम गृहस्थांकडे राहिले. ते अनेक मुस्लीम चाहत्यांकडे भोजनासाठी जात. जयपूर संस्थानात ते दोन आठवडे राहिले. अलवारचे महाराजा मंगलसिंग, खेतरीचे महाराजा अजितसिंग त्यांचे निस्सीम भक्त बनले. अजमेरला मोईनुद्दीन चिस्तीच्या दर्ग्याला ते गेले. तेथून माऊंट आबूला गेले. खेतरीचे कारभारी मुन्शी जगमोहनलाल त्यांना भेटले तेव्हा त्यांनी नरेंद्रांना विचारले, ''हिंदु साधू मुस्लीम व्यक्तीच्या घरी कसा राहतो?'' यावर स्वामीजी म्हणाले, ''ईश्वर किंवा धर्मग्रंथांनी मना केलेले नाही. समाजाने अशा भिंती उभ्या केल्या आहेत.'' दिवाण या आगळ्या उत्तराने आश्चर्यचकित झाले.

गुजराथ, बडोदा, खांडवा, मुंबई, पुणे करत १८९२च्या १०ऑक्टोबरला नरेंद्र कोल्हापुरात आले. महाराणी आनंदीबाईनी त्यांचा सत्कार केला, तेव्हा भगवी वस्त्रे नि कोल्हापुरी चप्पल त्यांनी स्वीकारले. तेथून ते बेळगावला गेले व १५ ऑक्टोबर रोजी प्रो. जी. एस. भाटे यांच्याकडे उतरले. हरिपदबाबू या बंगाली वनाधिकाऱ्याकडे राहिले. तो बंगला आता कर्नाटक शासनाने विवेकानंद आश्रमाला दिला आहे. पुढे गोवा, बेंगलोर करत म्हैसूरला आले. म्हैसूरचे अधिपती चामराजेंद्र ओडियार त्यांचे भक्त बनले. त्यांनी राजभवनात स्वामीजींचा आवाज ग्रामोफोनवर रेकॉर्ड करून ठेवला होता. तेथून नरेंद्रांनी त्रावणकोर, कन्याकुमारी असा प्रवास केला.

समुद्रातील खडकावर नाव घेऊन जाणारा नावाडी मिळेना म्हणून मग स्वामीजींनी भर समुद्रात उडी घेतली व पोहत खडकावर पोहचले. तेथे ते तीन दिवस होते. तेथे चिंतन करताना भारताच्या दुर्बलतेचे; तसेच सामर्थ्याचेही त्यांना दर्शन झाले. सर्वसामान्य जनतेचे दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रद्धा पाहून त्यांचे हृदय दु:खीकष्टी बनले. गौतम बुद्धाची अपार करुणा त्यांच्या हृदयात साठून राहिली. बुद्धाने दु:खमुक्तीचा मार्ग शोधला. मला आज माझ्या देशातील सर्वसामान्य माणसांच्या दु:खनिवारणाचा मार्ग सापडेल? या प्रश्नाचे उत्तर; तसेच त्यासाठीचा मार्गही त्यांना सापडला. ते परत पोहत समुद्रकिनारी आले. शार्क माशांचा वावर असतानाही खवळलेल्या समुद्रात जाऊन, तीन दिवस



उपाशी राहून; पुन्हा पोहत येणे हे येरागबाळ्याचे काम नव्हे. त्यासाठी असा योद्धा संन्याशीच हवा. तेथून ते पायी रामनद, पाँडिचेरी, मद्रासला आले. अमेरिकेत होणाऱ्या जागतिक सर्वधर्मपरिषदेत जाण्याचा नरेंद्रांचा विचार साऱ्या भक्तांनी उचलून धरला. स्वामीजींची कीर्ती तोपर्यंत सर्वत्र पसरली होती. ते १० फेब्रुवारी, १८९३ रोजी हैदराबादला आले, तेव्हा स्टेशनवर विशाल जनसमुदाय स्वागताला उपस्थित होता, याचे त्यांना आश्चर्य वाटले. त्या जनसमुदायात राजा श्रीश्रीनिवासन, महाराजा रंभाराव, पंडित रतनलाल , राम-सुल उलेमा, सय्यद अली बिलग्रामी, नवाब इमामबंद बहादूर, नवाब सिकंदर, निवाजजंग बहादूर, शेठ मोतीलाल, कॅप्टन रघुनाथ व अनेक प्रसिद्ध व्यक्ती उपस्थित होत्या. साऱ्यांनी स्वामीजींचा जयघोष केला. हे सारे घडले ते जागतिक परिषदेपूर्वी!

निजामसाहेबांचे वंशज शालक नवाब सर खुर्शीदजंग बहादूर, अमीर-इ-कबीर यांच्या निमंत्रणावरून स्वामीजी निजामसाहेबांच्या राजवाड्यात उपस्थित झाले. निजाम हिंदुधर्माबद्दल श्रद्धा बाळगीत. भारतातील अनेक तीर्थक्षेत्रांना ते जाऊन आले होते. त्यांना स्वामीजींच्या सर्वधर्मसमन्वयाच दृष्टिकोन भावला. शिकागोच्या सर्वधर्मपरिषदेला जाण्यासाठी स्वामीजींना त्यांनी एक हजार रुपये देऊ केले; पण स्वामीजींनी नम्रपणे ती भेट नाकारली व योग्य वेळी कळवेन, असे सांगितले.

समुद्रोल्लंघन म्हणजे पाप, असे मानण्याचा तो काळ होता नि त्यासाठी प्रायश्चित्त घेणे, ही धर्मरूढी मानली होती. स्वामीजींनी ती धुडकावून लावली. त्यांनी कर्मकांड करणाऱ्या आपल्याच सनातनी गुरुबंधूंना सांगितले, ''हे पाहा, मी साऱ्या भारतभर फिरलो. माझे मन खूप उद्विग्न बनले आहे. सर्वसामान्य जनतेचे भयानक दारिद्र्य, हालअपेष्टा, अंधश्रद्धा यातून मुक्त केल्याशिवाय त्यांना धर्म शिकवणे व्यर्थ आहे. या मुक्तीसाठी काही मार्ग शोधण्यासाठी मी आता पाश्चात्त्य देशांत जात आहे.

स्वामीजींच्या या भूमिकेशी बहुतांश उच्चवर्णाचे मानणारे गुरुबंधू असहमत होते. ते अमेरिकेला जाण्यापूर्वी आणि परतल्यावरही समुद्रोल्लंघन करणे, अनाथ मुलींसाठी, स्त्रियांसाठी, सर्वच धर्मीयांसाठी अनाथाश्रम, शाळा येथील प्रवेश मुक्त करणे, दुष्काळ, प्लेगादी साथीचे रोग पसरण्याच्या काळात जनसेवा करणे; अशी कामे कधी संन्यासी करतात का? हा त्यांचा कायस्थ कुलोत्पन्न

नरेंद्रना सवाल होता. पण, त्याचे उत्तर स्वामीजी कृतीनेच देत राहिले. 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय, आत्मनो मोक्षार्थ जगद्‌हितायच' हे ब्रीदवाक्य त्यांनी आपल्या संस्थेला दिले.

स्वामी विवेकानंद ३१ मे, १८९३ रोजी मुंबईहून एस. एस. इम्प्रेस ऑफ इंडिया या बोटीने अमेरिकेला निघाले. चीन, जपानला बोट थांबली. मंगळवार दि. २५ जुलैला ते कॅनडाला पोहोचले. आणखी पाच दिवसांनी ते शिकागोला पोहोचले. तेथे समजले की, ती परिषद सहा आठवडे पुढे ढकलली आहे. बोस्टन या स्वस्त शहरात थांबण्याचा त्यानी निर्णय घेतला. त्यांचे व्यक्तिमत्त्व राजबिंडे असल्यामुळे नरेंद्र हे भारतातील एखादे संस्थानिक असावेत, असे वर्णन तिथल्या वृत्तपत्रांनी केले. तेथे त्यांचा प्रोफेसर राइट व मान्यवरांशी परिचय झाला. परिषदेपूर्वीच्या काळात त्यांची बोस्टनमध्ये १३ व्याख्याने झाली असल्यामुळे सर्वत्र त्यांचा चांगला परिचय झाला.

परिषदेसाठी स्वामीजी स्वतंत्र विचारवंत म्हणून दाखल झाले, हिंदुधर्माचे प्रतिनिधी म्हणून नव्हे. टाळ्यांच्या कडकडाटानंतर त्यांचे भाषण पुढे चालू झाले. ते म्हणाले, ''जगातल्या सर्वांत प्राचीन साधू परंपरेतील प्रथम साधू गौतम बुद्ध होते. भारतीय धर्माची जननी अशी श्रमण परंपरा व त्या परंपरेच्या शाखा म्हणजे बुद्ध व जैनधर्म आणि शेवटी सर्व जातिपंथांच्या कोट्यवधी हिंदू लोकांच्या वतीने मी तुमचे आभार मानतो. जातिधर्मांतील भेदाभेद, पूर्वजांचा फाजील अभिमान यांनी पृथ्वीवर अनेक वर्षे ठाण मांडले. त्यामुळे पृथ्वी रक्तबंबाळ झाली. अनेक संस्कृतींचा विनाश घडला नि अनेक देश रसातळाला गेले. पण, आता वेळ आली आहे ती बदल घडवण्याची. परिषदेला आलेल्या प्रतिनिधींच्या स्वागतासाठी वाजवण्यात आलेल्या बेलचा प्रत्येक टोला म्हणजे धार्मिक अतिरेकाचे दफन करणाऱ्या पेटीला मारलेला खिळा असेल (यावर टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला). तलवारीच्या किंवा लेखणीच्या बळावर जर कोणी दुसऱ्याला गुलाम करू इच्छित असेल, तर त्याच्यासाठीदेखील हा निर्वाणीचा इशाराच असेल (विविध वृत्तपत्रांनी १२ सप्टेंबरच्या आवृत्तीत हे वर्णन केले आहे). भाषण संपले, तरी टाळ्यांचा गजर चालूच राहिला. विविध धर्मांतील सर्वोत्तम गोष्टी एकत्र करून एक वैश्विक धर्म मांडला.

याच परिषदेच्या विज्ञान विभागात स्वामीजी सहभागी झाले. तेथे त्यांची



एकूण चार भाषणे झाली. तेथे वैज्ञानिक दृष्टिकोनातून त्यांनी धर्मचिकित्सा केली.

संदेहवादी विचारवंत रॉबर्ट ग्रीन इंगरसोल यांच्याशी त्यांची चर्चा झाली. स्वामीजी म्हणत, ''स्पष्ट बोलणाऱ्या इंगरसोलप्रमाणे एकवेळ नास्तिक बना; पण सनातनी ढोंगी धार्मिक बनू नका.'' अमेरिकेतल्या रूढिप्रिय धर्ममार्तंडांनी स्वामीजींवर टीका केली, त्या वेळी इंगरसोल स्वामीजींना म्हणाले, ''पन्नास वर्षांपूर्वी जर तुम्ही धर्म शिकवायला आला असता, तर अमेरिकेतल्या या कर्मठ धार्मिकांनी तुम्हांला दगडाने ठेचून मारले असते किंवा जिवंत जाळले असते.''

स्वामीजींची कीर्ती जशी वाढत गेली, तशी त्यांच्या ख्रिश्चन व सनातनी रूढिप्रिय स्वकीयांनी त्यांच्याविषयी अमेरिकेत नि भारतात जी पत्रके वाटली त्यामुळे स्वामीजी व्यथित झाले. मुंबईचे नगरकर, पुण्याच्या ख्रिश्चनबाई सोराबजी त्यात आघाडीवर होत्या. त्या पत्रकात खालील मजकूर होता-

१) हा ब्राह्मण नाही. हा क्षत्रिय असून, हायकोर्ट ॲटर्नी विश्वनाथ दत्तांचा मुलगा आहे.

२) तो मांसमच्छी खातो.

३) हिंदुधर्माच्या कोणत्याही संघटनेने आपला प्रतिनिधी म्हणून शिकागोला परिषदेला पाठवले नव्हते.

४) काळा समुद्र ओलांडण्याचे पाप त्याने केले आहे.

५) हा बुद्धही नाही. वृत्तपत्रांनी त्याला ब्राह्मण, साधू, बुद्धमहंत म्हटले, हे चुकीचे आहे.

६) हा चातुवर्ण्याच्या विरोधात बोलतो.

स्वामीजींच्या उच्चवर्णीय गुरुबंधूंनी हे गैरसमज दूर करण्यासाठी काहीच केले नाही. स्वामीजींचे बंधू डॉ. महेंद्रनाथ दत्त यांनी बैठका घेतल्या, वृत्तपत्रांतून खुलासे केले. ५ सप्टेंबरला कोलकात्याच्या टाऊन हॉलमध्ये झालेल्या अभिनंदनाच्या सभेला चार हजारांवर लोक जमले. राजा पेरी मोहन मुखर्जी मान्यवर उपस्थित होते. ६ आणि १६ सप्टेंबरला विवेकानंद व अमेरिकन जनतेचे अभिनंदन करणारे अग्रलेख प्रसिद्ध झाले, त्यात म्हटले होते, ''स्वामी विवेकानंदांनी जागतिक परिषदेत साऱ्या हिंदुस्थानचे प्रतिनिधित्व केले आहे.

याबद्दल सारा देश त्यांच्या या कार्याचा गौरव करत आहे व त्यांचे अभिनंदन करत आहे.'' सभेत अभिनंदनाचे ठराव मंजूर झाले व स्वामीजींविषयी मानपत्रातून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

हॉर्वर्ड विद्यापीठात विद्यार्थ्यांपुढे स्वामीजींची व्याख्याने झाली. अमेरिकेतल्या शेकडो भक्तांना त्यांनी पत्रे लिहिली, मार्गदर्शन केले. पण, कधीही स्वत:ला वेदांचा अनुयायी म्हणवले नाही किंवा स्वत:चे विचार हा वेदांचा संदेश आहे, असेही कधी म्हटले नाही. सर्वधर्मांतील संतुलन मांडता मांडता, ते सर्व धर्मांतील एकतेवर बोलू लागले. ६ मे रोजी स्वामीजींनी त्यांचे मद्रासमधील भक्त आलासिंगा पेरुमल यांना पत्र लिहिले. त्यात ते म्हणतात, ''मला येथे एक मानवतेची नवी व्यवस्था निर्माण करायची आहे.'' आपल्या नव्या क्रांतिकारक आध्यात्मिक कार्याची दिशा स्वामीजींसमोर स्पष्ट होती. न्यूयॉर्क हेरॉल्डमध्ये प्रसिद्ध झालेल्या एका जाहिरातीत म्हटले होते की, भारताच्या स्वामी विवेकानंदांची धर्मचिकित्सा व योगविज्ञान या विषयांवर दोन व्याख्याने होतील.

## धर्म म्हणजे किराणा दुकान नव्हे

स्वामीजींनी एका वर्गात सांगितले, ''धर्म म्हणजे किराणा दुकान नव्हे. देवाजवळ भौतिक गोष्टींची तुम्ही सतत मागणी करता, याचना करता. स्वर्ग ही त्याच मालातील एक गोष्ट मागता. खरे भक्त असाल, तर अशा मागण्या सोडा. असा काल्पनिक स्वर्ग या पृथ्वीपेक्षा फारसा वेगळा नसतो. तेथे आपणांला काही दु:खे आहेत नि सुखेही आहेत. ख्रिश्चन कल्पनेप्रमाणे स्वर्ग म्हणजे तीव्र इंद्रियसुख. मग देव असा कसा असू शकेल? हजार वेळा स्वर्गात जाल नि तितक्याच वेळा खाली कोसळाल. या साऱ्या चमत्कारिक जंजाळात फसू नका. प्रत्येक गोष्टीला आम्ही घाबरतो. स्वर्ग व नरक या काल्पनिक गोष्टी सोडा. वास्तविक तुमच्यातील अमर्याद शक्तीची जाणीव तुम्हांला व्हायला हवी. मगच तुमची सारी बंधने, शृंखला तुटून पडतील.''

२२ ऑगस्ट, १८९५च्या इंडियन मिरर या वृत्तपत्रात बातमी प्रसिद्ध झाली होती. त्या बातमीत म्हटले होते, ''सर्व धर्मांना सामावणारी Temple universal नावाची संस्था स्थापन केली आहे. The swami has established in every principal town in the united states a branch of his new association called Temple universal." यानंतर स्वामीजींनी वेदान्त सोसायटीचीही



स्थापना केली. त्यांचे तत्त्वज्ञानाचे वर्ग पूर्णपणे मोफत असत, हे या सोसायटीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य.

## विज्ञानवादी विवेकानंद

हार्डमन हॉलमध्ये १९ व २६ जानेवारी, १८९६ रोजी झालेल्या स्वामीजींच्या भाषणाचे विषय होते, 'The cosomos, The microcosmos' या व्याख्यानाची पुस्तिका प्रसिद्ध झाली. 'कॉसमॉस' या नावाने ती न्यूयॉर्कमधल्या ब्रॉन टॅनोच्या साहित्य ग्रंथालयात विक्रीसाठी उपलब्ध होती. त्यांचे 'इथर' या विषयावरही व्याख्यान झाले. निकोला तेसला Nikola Tesla हा शास्त्रज्ञ मूळचा युगोस्लाव्हियाचा. त्या वेळी चाळिशीत असलेला गृहस्थ. इलेक्ट्रोमॅग्नेटिक वेव्हजचे गुणधर्म त्याने एडिसनपेक्षा सूक्ष्मतेने मांडले होते. पॉलिफेज, अल्टरनेटिव्ह करंट, उच्च दाब, उच्च फ्रिक्वेन्सी यांबाबत त्यांचे संशोधन प्रसिद्ध झाले. स्वामीजी व त्यांची विज्ञानावर तासन्‌तास चर्चा चाले. १८९६ साली नायगारा धबधब्यावर जलविद्युत प्रकल्प उभारण्याची कल्पना याच शास्त्रज्ञाची. तेथील वीज उच्च दाबाने किती मैल पाठवता येते, हे सांगण्याचे जनकत्व तेस यांनाच जाते. असा थोर शास्त्रज्ञ स्वामीजींच्या वर्गाला आवर्जून उपस्थित राहात असे.

इकडे जे. एम. थोर्बन आणि बॅरिस्टर के. सी. बॅनर्जी यांची द्वेषबुद्धी जागी झाली. त्यांनी आपल्या भाषणांतून सांगितले की, संदेहवादी, नास्तिक बॉब इंगरसोलपेक्षा विवेकानंद जास्त धोकादायक आहेत; कारण ते अधिक सूक्ष्म आहेत. सनातनी हिंदू आणि ख्रिश्चन धर्मीयांची डोकी बिघडवण्याचे काम ते करीत असून, त्यांना ते धर्मापासून दूर नेत आहेत. आपल्या लोकांचे डोळे उघडण्याची गरज आहे. या टीकेचा उलटा परिणाम असा झाला की, डेट्रॉईटमध्ये चार हजार श्रोते स्वामीजींच्या अमृतवाणीसाठी उपस्थित राहिले. The Ideal of Universal Religion या विषयावर ते बोलले व वृत्तपत्रांनीही या भाषणाची चांगली दखल घेतली.

मुंबईहून एक अनोळखी तरुण आला. त्याला लोखंड कसे बनवायचे याचे तंत्र जाणून घ्यायचे होते. स्वामीजींनी त्याला काही पैसे दिले आणि परिचितांना पत्र देऊन त्या तरुणाला योग्य मार्गदर्शन करण्याची विनंती केली. या माझ्या भारतीय तरुणाला नव्या जगाच्या, शोधांच्या दिशेने जाण्याची गरज आहे, असे

स्वामीजींनी लिहिले. व्हाइट स्टार लाइनच्या बोटीवर १५ एप्रिल, १८९६ रोजी दुपारी १२ वा. स्वामीजी डेकवर उभे राहिले. तपकिरी रुमाल फडकवत त्यांनी बंदरावर जमलेल्या अनेक मित्रांना, शिष्यांना निरोप दिला. अशा रितीने स्वामीजींचा अमेरिकेचा पहिला दौरा यशस्वीरीत्या पार पडला.

इंग्लंडमध्ये स्वामीजींच्या तत्त्वज्ञ विल्यम जेम्स, मॅक्सम्युलर, भारतीय शास्त्रज्ञ डॉ. जगदीशचंद्र बोस यांच्याबरोबर गाठीभेटी झाल्या. कोलंबिया विद्यापीठाने त्यांना संस्कृत विषयाचे प्रमुखपद देऊ केले, तर हॉर्वर्ड विद्यापीठात पौर्वात्य विषयाचे प्रमुखपदही देऊ केले; पण आपण संन्यासी असल्याने ते स्वीकारू शकत नाही, असे त्यांनी कळवले.

◆


**डॉ. सुभाष के. देसाई यांची साहित्यसंपदा**

| | | |
|---|---|---|
| १) | महायोगी गौतम बुद्ध | रू. २००/- |
| २) | Mahayogi Gautam Buddha | रू. २००/- |
| ३) | छ. शिवाजी महाराज (चरित्र) | रू. १५०/- |
| ४) | आत्मदर्शन (आत्मचरित्र) | रू. ३००/- |
| ५) | श्रीदत्ताबाळ समग्र वाङ्मय | रू. ६००/- |
| ६) | आधुनिक मानवासाठी नवसाधना | रू. ३५०/- |
| ७) | श्रीदत्ताबाळ (चरित्र) | रू. १००/- |
| ८) | निधर्मी नैतिकता | रू. ६०/- |
| ९) | धर्म आणि विज्ञान | रू. १००/- |
| १०) | Relevance of Scientific Conclusions to Religion | रू. ८०/- |
| ११) | ग्राहक प्रबोधन | रू. १००/- |
| १२) | गायत्री | रू. ६०/- |
| १३) | १५० वर्षातील चित्र शिल्प परंपरा | रू. १३५/- |
| १४) | बुद्ध चरिया | रू. ६०/- |
| १५) | पुरोगामी केशवराव भोसले | रू. ४०/- |
| १६) | सॉक्रेटीस | रू. १००/- |

सिंहवाणी प्रकाशन, ११ ब शिवाजी स्टेडियम, कोल्हापूर. फोन : ९४२३०३९९२९




## धर्माचा धंदा

२९ मे, १९०० रोजी स्वामीजींनी सॅनफ्रान्सिस्को येथे दिलेल्या भाषणात 'गीता, उपनिषदे व पुरोहित' या विषयावर सांगितले, ''प्रत्येक देशात पुरोहित हे जुन्याला चिकटून राहणारे किंवा पुराणमतवादी असतात, त्याला दोन कारणे आहेत. एक तर त्यांचा उदरनिर्वाह त्यावर अवलंबून असतो आणि दुसरे म्हणजे ते केवळ लोकांबरोबर जाऊ शकतात. लोक जर म्हणतील, 'दोन हजार देवांचे प्रतिपादन करा', तर पुरोहित तसे करतील. जो लोकसमूह त्यांना पैसे देतो, त्यांचे ते सेवक असतात. ईश्वर त्यांना पैसे देत नाही; म्हणून पुरोहितांना धर्माचा धंदा करावा लागतो. तुमची जशी पात्रता असेल, तसेच पुरोहित तुम्हांला लाभणार.''

### अद्वैताश्रम

इंग्लंडच्या सेव्हिअर दांपत्याने हिमालयात मायावती येथे एक छोटासा चहाचा मळा खरेदी केला. त्या ठिकाणी मायावतीचा अद्वैताश्रम सुरू झाला. स्वामीजींना हे आधुनिक विचारांचे आध्यात्मिक केंद्र बनवायचे होते. तेथे चातुर्वर्ण्य व्यवस्था, मूर्तिपूजा व कर्मकांड यांना स्थान नव्हते. जीवनाच्या कोणत्या क्षेत्रांत काम करता याला काहीही प्राधान्य नव्हते. दिव्य मानवाचा आविष्कार महत्त्वाचा होता. निर्गुण-निराकार चैतन्याची उपासना तेथे महत्त्वाची होती. बालवाडीतील धर्मापासून पुढे जाऊन साऱ्या जगासाठी तो मुक्त असेल. यातून त्यांना नवे तत्त्वज्ञान मांडायचे नव्हते; पण आध्यात्मिक साधनेची धर्मनिरपेक्ष, जातपंथनिरपेक्ष नवी पद्धती त्यांना प्रत्यक्ष आचरणात आणावयाची होती. जुन्या अंधश्रद्धांना फाटा द्यायचा होता. तेथे त्यांना मूर्तिपूजाही नको होती. स्वामीजी म्हणत, ''Here people shall rise and cast off these Kindergartens of religion and shall make vivid and powerful true religion, the worship of the spirit by the spirit."

पूजा, पाठ, भक्ती, मंत्र, जप, ध्यान यांसाठी कोलकात्यातल्या आश्रमात मुभा होती; पण स्वामीजींना हिमालयात असे केंद्र हवे होते की, जेथे या

गोष्टींना प्रवेश नसेल. शुद्ध अद्वैत वेदान्ताचा अभ्यास व प्रात्यक्षिके करायची मुभा असेल. तेथे निर्भय आणि अंधश्रद्धामुक्त मुलांना घडवता येईले. प्रत्येक जण चैतन्याचा अंश आहे, अशा दृष्टीने मुलांकडे पाहिले जाईल. प्रत्येकासमोर असे ध्येयच असेल. स्वामीजींनी वेदान्ताची सूत्रे सांगितली; पण खऱ्या अर्थाने यापूर्वी त्यांचे जीवनात प्रयोग झालेले नाहीत. वेदांत हे जरी जगातले प्राचीन तत्त्वज्ञान असले, तरी त्यात नेहमीच अंधश्रद्धा, जातपात व इतर अनावश्यक गोष्टी मिसळल्या गेल्या आहेत. साधेपणा, चारित्र्यसंपन्नता आणि आज्ञाधारकपणा हे तीन गुण प्रत्येक साधकाने पाळण्याची महत्त्वाची अट या अद्वैताश्रमात होती. शारीरिक, बौद्धिक व आध्यात्मिक सुदृढता लाभलेल्या संन्याशांनी शिक्षकाची भूमिका स्वीकारून हिंदुधर्माचे खरे स्वरूप पुढे तीस वर्षे प्रबुद्ध भारत या मासिकातून मांडले. हे मासिक याच मायावतीच्या अद्वैताश्रमातून प्रसिद्ध होत होते.

१९०१ साली स्वामीजी मायावती आश्रमात आले, तेव्हाची ही घटना आहे. या अद्वैताश्रमात स्वामी स्वरूपानंदांनी एका खोलीत रामकृष्णांचे मंदिर बांधून त्यात पूजा, आरती, चालू केली होती. तेव्हा त्यांना स्वामीजींनी बजावले की, ही कर्मकांडे म्हणजे खरा धर्म नव्हे. मला हे येथे नको आहे. एका तरी ठिकाणी निर्गुणनिराकार स्वरूपात ईश्वरचिंतन करू द्याल तर खरे! झाले! कर्मकांड बंद झाले. स्वामीजींना या अद्वैताश्रमामधून हिंदू धर्माचे खरे स्वरूप आचरणात आणावयाचे होते.

## सारे समान

कोलकाता येथे व्याख्यानात स्वामीजी म्हणाले, ''जनतेला ज्या कर्मकांडांच्या शृंखलांनी बांधून ठेवले होते, त्या तोडून टाकण्याचे काम बुद्ध धर्माने केले. आहार, स्नान यांचाही वापर शृंखला म्हणूनच केला गेला. केवळ आहारानेच आत्मसाक्षात्कार होणार असेल, तर पुरोहितांनी आयुष्यभर एखाद्या वानराला दूधभाताचा आहार द्यावा, ज्यामुळे तो थोर साक्षात्कारी योगी होईल! तीर्थक्षेत्रातील नदीत स्नान केल्याने जर पापे धुवून जात असतील नि स्वर्गप्राप्ती होत असेल, तर गंगेचे पाणी प्यालेल्या माझ्या पोटातील माशांनाही स्वर्गप्राप्ती झाली पाहिजे आणि भाजीपाला खाल्ल्याने जर मोक्ष मिळत असेल, तर गायी, हरणे व ससे यांना आपल्या आधी मोक्ष मिळाला पाहिजे.''



## रशियन क्रांतीचे भाकीत

श्रीमती फ्लोरेन्स ॲडाम यांनी स्वामीजींसाठी रशियाच्या दौऱ्याची आखणी केली होती. एप्रिल १८९६मध्ये त्या स्वत: व प्रिन्स आणि प्रिन्सेस वोलकोन्स्को हे शिकागोमध्ये होते. त्या काळात रशिया राजेशाहीच्या अमलाखाली होता. पण, स्वामीजींनी जे सांगितले त्यातून स्वामीजींचे द्रष्टेपण स्पष्टपणे दिसते. स्वामीजी म्हणाले, "The great upheaval which is to bring about a new epoch will come from Russia or china." रशियन क्रांतीचे हे भाकीत १८९५चे. त्या वेळी रशियामध्ये अतिधार्मिक लोक होते. गूढवादाचा मोठा प्रभाव होता. स्वत: झार सम्राट म्हणाला होता की, भारत ही आध्यात्मिकतेची आणि शहाणपणाची भूमी आहे. झारच्या या भारताकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाचा स्वामीजींना आनंद झाला होता. त्यांनी रशियाला भेट देण्याचे जवळजवळ निश्चित केले होते. पण, अचानक बोस्टन व रशियाचा दौरा रहित करून स्वामीजी भारतात परतले. त्याचप्रमाणे सिलोनमध्ये धर्मपाल यांच्याकडे आठवडाभर थांबून १८९७मध्ये चीन व जपानचा दौरा करू, असे त्यांनी योजले. भारतीयांना ते लिहितात की, तुमच्या संकुचित मनोवृत्तीतून, कर्मकांडांतून बाहेर या व जपानला दरवर्षी भेट द्या आणि पाहा त्यांच्या प्रगतीच्या दिशा.

उद्‌बोधन या बंगाली मासिकाच्या मार्च १८९९च्या अंकात स्वामीजी लिहितात, ''वेश्यापुत्र वशिष्ट व नारद, दासीपुत्र सत्यकाम जाबाल, कोळी व्यास, पिता अज्ञात असलेले कृप, द्रोण, कर्ण इत्यादी शूद्र कुलातील व्यक्ती अंगी असलेल्या स्वपराक्रमाने वा विद्वत्तेने क्षत्रियपदाला वा ब्राह्मणपदाला पोहोचले. आता अशी वेळ येत आहे की, जगभरातील शूद्र जाती आपल्या शूद्रत्वानिशी प्रभावी व्यवसायांसह क्षत्रिय, वैश्य वा ब्राह्मण न बनता, शूद्रत्व कायम ठेवून प्रत्येक समाजामध्ये संपूर्ण प्रभुत्व पावतील. पाश्चात्त्य जगात या नवीन सत्तेचा उदय झाल्याची चिन्हे हळूहळू दिसू लागली आहेत.

स्वामीजी कोलंबोला आले, तेव्हा तेथे त्यांचे प्रचंड स्वागत झाले. पंबन येथे रामनदचे अधिपती राजा भास्कर वर्मा सेतुपती हे स्वत: स्वामीजींच्या स्वागताला पुढे आले. स्वामीजींना दिलेल्या मानपत्राचे वाचन झाले. मानपत्राच्या उत्तरादाखल स्वामीजींचे भाषण झाले. रामेश्वरला मंदिरात झालेल्या व्याख्यानात स्वामीजी म्हणाले, ''खरा धर्म शुद्ध आणि प्रामाणिक प्रेमात आहे. धर्म हा

मंदिरात नाही; तसाच तो धार्मिक उत्सवातही नाही. जोपर्यंत मनुष्य शरीर व मनाने शुद्ध बनत नाही, तोपर्यंत मंदिरात येणे, शिवपूजा करणे निरर्थक आहे. शुद्ध हृदयाच्या पवित्र शरीर व मनाच्या प्रार्थना शिव ऐकतात, त्याला प्रतिसादही देतात. बाह्यपूजा हे आंतरिक पूजेचे प्रतीक आहे. शिवरूपाने वावरणाऱ्या गोरगरीब, गरजूंची सेवा करा म्हणजे शिव प्रसन्न होतील, केवळ त्यांच्या नाम, भजन, स्तुतीने काही होणार नाही. आरशावर धूळ साठली, तरी आपण आपली प्रतिमा नीट पाहू शकत नाही, त्याचप्रमाणे दुष्टबुद्धी आणि स्वार्थ हे धूर आणि धुळीप्रमाणे आत्मदर्शन घडवू देत नाहीत, त्यामुळे नि:स्वार्थी बना, त्यागी बना.''

रामेश्वरची राजधानी रामनद येथे स्वामीजींचे २५ जानेवारी, १९९७ला आगमन झाले. राजा भास्कर वर्मांनी रामनद येथे स्वामीजींचे भव्य स्वागत केले, स्वामीजींना मानपत्र दिले. परकुडीच्या स्वागत समारंभात स्वामीजी म्हणाले, ''पाश्चात्त्यांच्या जडवादी विचारांनी भारतासाठी नवे द्वार उघडले आहे. त्यांनी जातीपातीच्या भिंती उद्ध्वस्त केल्या. मूठभर लोकांची आध्यात्मिक ज्ञानाची मक्तेदारी त्यामुळे मोडली गेली. गव्हाणातील कुत्र्यासारखे हे सनातनी स्वत: खात नव्हते नि दुसऱ्यालाही ज्ञान देत नव्हते. पश्चिमेकडे आलेली राजकीय व्यवस्था स्वातंत्र्य, समता, बंधुतेचा संदेश घेऊन आपल्याकडे येत आहे. पश्चिमेकडे संपत्ती आणि सत्ताधारी मानवजातीचा शाप ठरत आहेत, तर पूर्वेकडे भारतात पुजारीवर्ग हा भारतीयांना शाप ठरत आहे.''

कुंभकोणम येथे स्वामीजी म्हणाले, ''ब्राह्मण समाजाला शिक्षणाची वंशपरंपरागत आवड आहे, तशी ती दीनदलितांना नाही; त्यामुळे ब्राह्मणांच्या शिक्षणावर पैसा खर्च करू नका. परंतु, दीनदलित आणि उपेक्षितांच्या शिक्षणावर पैसा खर्च करा. त्यांना आधार द्या. दुर्बलांना सबल करा. बहुजन समाज जन्मजात हुशार नसतील, तर त्यांना हवे ते शिक्षक आणि शिक्षण द्या. हाच सामाजिक न्याय आहे. मला समजला तो न्याय असा आहे. प्रत्येक स्त्रीपुरुष, लहान मुले; मग ती कोणत्याही जातीत जन्मलेली असोत, ती दुर्बल असोत वा सबल, त्यांनी आता ऐकण्याची गरज आहे. 'उत्तीष्ठत् जागृत प्राप्य वरान्मिबोधत:' दुर्बलतेच्या संमोहनातून जागे व्हा. तुम्हांला कोणीतरी सतत सांगितले की, तुम्ही दुर्बल आहात, तर त्यातून बाहेर या. तुमच्यातील ईश्वराची जाण ठेवा.''



## क्षत्रियांना वगळाल तर काय राहील?

मद्रासच्या सनातनवादी संघटनेच्या मुखपत्रात लिहिले होते की, 'विवेकानंद शूद्र जातीत जन्मले. शूद्रांना संन्यास घ्यायचा काय अधिकार?'

याचा परखड शब्दांत खरपूस समाचार घेताना स्वामीजी म्हणाले, ''मी माझ्या पूर्वजांचा अभ्यास केला तेव्हा असे आढळले की, प्रत्येक ब्राह्मण 'यत्राय धर्मराजाय चित्रगुप्ताय वै नम:' असे शब्द म्हणून त्यांच्या पायाशी फुले वाहतो. युरोपच्या प्रवासातील दैनंदिनीत स्वामीजी उच्चवर्णीयांना आवाहन करतात, ''अहो, तुम्ही दडवून ठेवलेल्या पूर्वजांच्या हिऱ्यांच्या अंगठ्या नि प्राचीन रत्नमंजूषा हा खजीना आपल्या बांधवांना, बहुजनांना देण्याची आजपर्यंत तुम्हांला संधीच मिळाली नव्हती. आता या इंग्रजी राज्यात शिक्षणक्षेत्र सर्वांना खुले झाले आहे. ज्ञानाचा मार्ग सर्वांना मोकळा झाला आहे. आता तो तुमचा खजिना अगदी झटपट इतरांना देऊन टाकून तुमच्या अहंकारासह शून्यात विलीन होऊन जा. आता तुमच्या जागी नवभारताचा उदय होऊ दे. नांगर धरणाऱ्या शेतकऱ्यांच्या झोपडीतून नवा भारतवर्ष उभा राहू दे. कोळ्यांच्या, चांभारांच्या, भंग्यांच्या झोपडीतून नवा भारतवर्ष उभा होऊ दे, झाडाझुडपांतून, रानावनांतून दऱ्याखोऱ्यांतून, पहाडांतून नवा भारतवर्ष प्रगट होऊ दे.''

स्वामीजी लिहितात, ''माझ्या आयुष्यभराच्या आध्यात्मिक जीवनाचा अनुभव म्हणजे गूढवाद हा मानवतेला दुर्बलता आणणारा आहे. शतकानुशतके धर्ममार्तंडानी आमच्या माथी गूढवाद मारलेला आहे. तो इतका की, आमची बौद्धिक आणि आध्यात्मिक ताकद खच्ची करण्यात आली आहे. एक मात्र खरे की, जेव्हा तुम्ही आपल्या बांधवांना नि:स्वार्थीपणे मदत करू इच्छिता, तेव्हा प्रचंड ताकद निर्माण होते नि ती आश्चर्यकारक परिणाम दाखवते. अद्वैत ही अखंड, शाश्वत, शक्तीचे भांडार आहे; पण ते प्रत्यक्ष आचरले पाहिजे.''

मद्रासच्या तरुणांना आवाहन करताना ते म्हणाले, ''जगाला देण्यासाठी माझ्याजवळ संदेश आहे आणि तो निर्भयतेने मी मांडणार आहे. मला तरुण, उत्साही देशासाठी समर्पित भावनेने काम करणारे तरुण हवेत, तेच भारताला नि जगाला खरा धर्म समजावून सांगतील. भारतात एक क्रांतीची लाट आणतील. डोंगराएवढ्या संकटांना सामोरे जाणारे तरुण मला हवेत. सारा समाज एका

राष्ट्रीय नावेत बसला आहे. लाखो वर्षे या नावेने समाजाला पैलतीराला नेले. आता ती थोडी नादुरुस्त झाली आहे. ब्राह्मणांना शिव्याशाप देत बसण्यापेक्षा ती नाव दुरुस्त करा आणि हे काम मनापासून करणार नसाल, तर फुकट मरून जा. खरेतर तुम्ही अमृताचे पुत्र आहात, ईश्वरपुत्र आहात. सर्व सामर्थ्य पणाला लावा. विजय तुमचाच आहे.''

मद्रासमध्ये ट्रिपलीकेन लिटररी सोसायटीत ते 'The work before us. The future of India' या विषयावर बोलले. कोलकात्यात २८ फेब्रुवारीला राजा राधाकांत देवबहादूर यांच्या राजवाड्यात जाहीर सत्कारसमारंभ पार पडला. मानपत्राचे वाचन झाले. सुमारे पाच हजारांवर लोक शोभा बझाराच्या प्रांगणात जमले होते. राजेसाहेबांनी चांदीच्या करंड्यातून स्वामीजींना मानपत्र अर्पण केले. उत्तरादाखल स्वामीजी म्हणाले, ''बंगालच्या तरुणांनो, श्रद्धासंपन्न व्हा. चारित्र्याचे तेज जागृत करून मोठ्या उत्साहाने समाज व देशाच्या पुनर्बांधणीसाठी सज्ज व्हा. माझा हा कार्यभार युवकांनो तुम्ही ग्रहण करा. या कार्याची उन्नती व विस्तार माझ्या कल्पनेलाही दूर मागे टाकून पुढे जावो. मी केवळ दिग्दर्शन केले. तुम्ही ते पूर्ण करा.''

## विषमतेचा नायनाट करा

काही दिवसांनंतर कोलकात्याच्या स्टार थिएटरमध्ये स्वामीजींनी एक व्याख्यान दिले, त्यात ते म्हणाले, ''रूढी, लोकभ्रम, खुळचट समजुती आणि चातुर्वर्ण्य अशा कल्पनांशी मी कालत्रयी मिळते घेणार नाही. अद्वैत तत्त्वज्ञानाच्या शस्त्राने प्रचलित विषमतेचा नायनाट करणे, हे माझे जीवनव्रत आहे.'' मात्र, आलमबाजारमधील मठातील चातुवर्ण्य मानणाऱ्या गुरुबंधूंनी त्यांच्याशी वाद घातला.

## ब्राह्मण गुरुबंधूचाच विरोध

स्वामीजींच्या कार्यपद्धतीबद्दल आश्रमातलेच काही लोक शंका उपस्थित करू लागले, विरोध करू लागले. योगानंदाने विचारले, ''तुम्ही रामकृष्णांचा संप्रदाय का वाढवत नाही? तुमची कार्यपद्धती पाश्चात्त्य वळणाची, जनहितासाठी मिशन, सेवाश्रम, महिलांसाठी शिक्षण, मानवसेवा, बहुजन हिताय बहुजन सुखाय कार्य, हे काही संन्याशाचे काम नव्हे. संन्याशाने सर्वसंगपरित्याग



करायला हवा.'' यावर स्वामीजी हसत हसत व थोड्या विनोदाने म्हणाले, ''म्हणजे तुझे म्हणणे आहे की, शिक्षणाचा प्रचार करण्याने, अनाथ, रोगी यांची दुःखे दूर केल्याने, त्यांची सेवा केल्याने सगळे मुसळ केरात जाते नि माणूस लागलीच मायेत अडकून पडतो.'' मग थोड्या वेळाने कठोर भाषेत स्वामीजी म्हणाले, ''तुम्हांला काय वाटते? रामकृष्णांना तुम्ही माझ्यापेक्षाही जास्त समजून घेतले आहे? माझ्यापेक्षाही तुम्हांला ते जास्त कळले आहेत? तुम्ही ज्या प्रकारची भक्तीची भाषा बोलता, ती भाषा म्हणजे निर्बुद्ध लोकांची भावनाप्रधानताच होय, आणखी काही नाही. दरिद्री नारायणासाठी मी लाखो वेळा नरकात जायला तयार आहे.'' या आवेगानंतर स्वामीजी हातानी आपली छाती दाबून घेत, आपल्या खोलीत निघून गेले नि त्यांनी दार बंद करून घेतले. तासाभराने ते जेव्हा बाहेर आले तेव्हा म्हणाले, ''आता एखाद्या नाजूक फुलाचादेखील आघात सहन होत नाही.''

## मुसलमान फकिराने प्राण वाचवले

स्वामीजी दुसऱ्या वेळी जेव्हा इंग्लंडहून परतल्यावर १८९७मध्ये आल्मोड्यात आले, तेव्हा त्यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. त्या वेळी त्यांनी त्या फकिराला ओळखले नि जाहिररीत्या सांगितले की, याच्यामुळेच माझे प्राण वाचले. परिव्राजक अवस्थेत स्वामीजी आल्मोडा येथे आले होते. दिवसभरात पोटात अन्नाचा कणही नव्हता. ते पूर्ण थकून गेले नि बेशुद्ध पडले. अखंडानंद पाणी आणायला गेले. समोरच्या मुस्लीम कबरस्थानातल्या एका फकिराने त्यांना पाहिले. हातातली काकडी व पाणी घेऊन तो स्वामीजींकडे गेला; पण स्वामीजींमध्ये हात वर करण्याचेही त्राण उरले नव्हते. त्यांनी फकिराला तोंडात पाणी घालण्यास सांगितले. तो दचकून म्हणाला, ''मी मुसलमान आहे.'' तशाही अवस्थेत स्वामीजी म्हणाले, ''काय फरक पडतो? आपण भाऊ भाऊ आहोत.''

## मुस्लीम मुलांनाही प्रवेश द्या

स्वामीजींच्या मनात परधर्मीयांबद्दल सहानुभूती होती. त्यानी १० ऑक्टोबर, १८९७ला स्वामी अखंडानंदांना कळवले की, आपल्याला अनाथबालगृह हवे आहे. अनाथ मुलींना वाऱ्यावर सोडून देता येणार नाही, त्यांच्यासाठी एक

अपत्यहीन, वृद्ध विधवेची नेमणूक करा. मुलामुलींसाठी स्वतंत्र जागा हवी. तुम्ही ख्रिस्ती, मुसलमान मुलानांही प्रवेश दिला पाहिजे. परंतु, त्यांच्या धर्मात ढवळाढवळ करू नका. त्यांच्या खाण्यापिण्याची वगैरे तुम्हांस स्वतंत्र व्यवस्था करावी लागेल इतकेच. त्यांना असे शिक्षण द्या की, ज्यायोगे ती नीतिमान, पौरुषयुक्त बनून त्यांचे ठायी परोपकर बुद्धी बळावेल. हाच धर्म होय. तुम्ही आपली जडजंबाल तात्त्विक मते बाजूला ठेवून, अनाथालयातील मुलामुलींना धर्माची सार्वजनिक बाजूच शिकवा.

पंजाब, काश्मीर, जम्मू, रावळपिंडी, लाहोर येथेही त्यांचे प्रचंड स्वागत झाले नि त्यांची व्याख्यानेही झाली. लाहोरला प्रोफेसर तीर्थराम भेटले. स्वामीजींच्या व्यक्तिमत्त्वाचा, विचारांचा त्यांच्यावर इतका सखोल परिणाम झाला की, त्यांनी संन्यास घेतला व ते पुढे स्वामी रामतीर्थ म्हणून प्रसिद्ध पावले. खेतरीच्या महाराजांच्या राजवाड्यातील व्याख्यानात ते म्हणाले, ''विज्ञानाची प्रत्येक शाखा चराचरामागचे एकत्व शोधते आहे. ही गोष्ट भौतिक विज्ञानात खरी आहे नि अध्यात्मातही खरी आहे. धर्म आणि विज्ञान सत्याचा शोध घेतात, फक्त वेगवेगळ्या मार्गांने.''

मधुमेहाने उचल खाल्ली नि त्यांची प्रकृती बिघडली. अनेक निमंत्रणे असूनही त्यांना कोलकात्याला परतावे लागले. तेथील दमट हवेत त्यांना दम्याचा त्रास जाणवू लागला म्हणून ते दार्जिलिंगला रवाना झाले. त्यांची प्रकृती सुधारत होती. दरम्यान, कोलकात्यात प्लेगची साथ सुरू झाली. ते ३ मे, १८९८ला त्वरेने कोलकोत्यात पोहोचले. प्लेगच्या साथीविषयी, प्लेगवरील उपायांविषयी त्यांनी अनेक माहितीपत्रके तयार करून ती हिंदी, बंगाली भाषेत छापून वाटत, सेवाकार्य सुरू केले. सनातनी गुरुबंधूंनी शंका उपस्थित केली की, पैसा कोठून आणणार? यावर स्वामीजी त्वरित म्हणाले की, का बरे? तशी गरज पडली, तर मठासाठी घेतलेली जमीन विकून टाकू. शेकडो लोक वेदनेने तळमळत असताना, आपण मठात लोळत पडण्याऐवजी आपण संन्याशी फार झाले तर पूर्वीसारखे झाडाखाली राहू नि भिक्षा मागून जगू इतकेच ना? आपल्याला ते नवीन थोडेच आहे?

सुदैवाने मठाची जागा विकावी लागली नाही. चोहोबाजूंनी पैशांचा वर्षाव झाला नि जातपात न पाहता साऱ्यांना औषधोपचार मिळाले. प्लेगने पछाडलेल्या



स्त्रीपुरुषांना तेथे आणले नि माळावर उभ्या केलेल्या झोपड्यात ठेवून त्यांना सेवा देण्याचे कार्य सुरू केले. स्वामीजी स्वत: या कामावर देखरेख करीत. औषधोपचार, स्वच्छता, जागासफाई आदी कामे वालच्या वेळी केली जात असत. 'जेथे जीव, तेथे शीव' या भावनेतून दरिद्रीनारायणासाठी प्रत्यक्ष सेवाकार्य सुरू झाले. मृत्यूची तमा न बाळगता स्वामीजी व त्यांचे चाहते या कामी अहोरात्र राबले.

४ जुलै या अमेरिकेच्या स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून स्वामीजींनी आपल्या श्रीनगर मुक्कामात त्यांनी स्वत: लिहिलेली To the fourth day of July ही इंग्रजी कविता साऱ्या अमेरिकन शिष्यांना वाचून दाखवली (त्यानंतर बरोबर चार वर्षांनी स्वामीजींनी इहलोकाची यात्रा संपविली. ही अर्थपूर्ण कविता म्हणजे भावी घटनेची आगाऊ सूचना तर नव्हती).

अमेरिकेच्या दुसऱ्या दौऱ्यात स्वामीजींनी भारतीय संस्कृती का टिकून आहे, यावर विवेचन करताना सांगितले की, सर्व धर्मांना बांधणारे एक सूत्र आहे. भारतात विविध जातिजमाती आहेत. त्यांच्या देवांविषयीच्या कल्पना भिन्न भिन्न असूनही ते परस्परांशी मिळूनमिसळून, सहयोगाने वागतात म्हणून ही संस्कृती शतकानुशतके टिकून आहे. सॅनफ्रान्सिस्कोमध्ये स्वामीजी 'वैश्विक धर्म' या विषयावर बोलले (फेब्रवारी, १९००). धर्माचे विज्ञान या विषयावर ओकलँड येथे स्वामीजींचे व्याख्यान झाले.

न्यूयॉर्कहून स्वामीजी पॅरिसला आले. ३ ते ८ सप्टेंबर, १९०० या कालावधीत भरलेल्या धर्मेतिहासाच्या महासभेत ते सहभागी होऊन स्वामीजी इजिप्त मार्गे ९ डिसेंबर, १९०० रोजी कोलकात्यात परतले.

## बुद्धासारखी नास्तिक माणसे अधिक जन्मावीत

परमेश्वराच्या अस्तित्वावर गौतम बुद्धांचा भरवसा नव्हता; तसेच जीवात्म्याचे अस्तित्वही त्याला मान्य नव्हते. या गोष्टींची चौकशीच त्याने कधी केली नाही. याबाबतीत तो संशयवादी अथवा नास्तिक होता, असे म्हणण्यास हरकत नाही. पण, असे असतानाही कोणाही प्राण्याकरिता आपला जीव देण्याची त्याची तयारी होती. केवळ लोकांच्या बऱ्यासाठी सारा जन्म त्याने उद्योग केला आणि लोकांचे बरे व्हावे एवढाच विचार त्याच्या चित्तात सारा जन्म घोळत होता. अशा प्रकारची नास्तिक माणसे जितकी अधिक जन्माला येतील तितके बरे. जगाचे

कल्याण व्हावे एवढ्याचसाठी गौतम बुद्धांचा जन्म झाला, असे ज्या कोणी म्हटले आहे, ते अगदी बरोबर आहे. स्वत:ची मुक्ती साधावी म्हणून अरण्यात जाऊन तो ध्यानस्थ बसला नाही. सर्व जग दु:खाग्नीने होरपळून गेले आहे, असे पाहून त्या अग्नीच्या उपशमाची तरतूद त्याने चालविली. या जगात इतके दु:ख का भरले आहे, या एकाच प्रश्नाच्या उत्तरासाठी सारा जन्म तो धडपडत करीत होता. आपली नीतिमत्ता बुद्धाइतकी उज्ज्वल आहे, असे तुम्हांस वाटते काय?

भगवान बुद्धाने अलोट धैर्याने या दु:खसागरात जशी उडी घातली, तशीच तुम्हीही घाला. यातील दु:खे कमी करण्यासाठी धडपड करा. मग या प्रयत्नात तुमचा देहपात झाला, तरी हरकत नाही. स्वत:चे अस्तित्व तुम्ही पार विसरून जा. तुम्ही आस्तिक असा वा नास्तिक असा, संशयवादी असा अथवा वेदान्ती असा, ख्रिस्ती असा अथवा मुसलमान असा; आपले अस्तित्व विसरून जगाची दु:खे कमी करण्यासाठी झटणे, हेच आपले आद्य कर्तव्य आहे, हा पहिला धडा गिरवा. हा क्षुद्र अहंभाव टाकणे आणि आपला सत्य विश्वभाव प्रगट करणे, हेच आपले खरे ध्येय आहे.

## विश्वव्यापी धर्म

आपल्या मानसिक उन्नतीकरिता जी धडपड आपण करतो, ती मापण्याचे साधन आपला धर्म हे होय. आपल्या विशिष्ट देशात कोणत्या धर्मकल्पना प्रचलित आहेत, हे समजले म्हणजे तेथील समाजाची मानसिक अवस्था कोणत्या कोटीची आहे, हे जाणता येते. अनेक प्रकारच्या समाजरचना जगात आज उपलब्ध असून, त्यांच्यात जसे अखंड तंटे सुरू असतात, त्याचप्रमाणे अनेक धर्म उपलब्ध असून, त्यांच्यातही तंटे सुरू आहेत. धर्मामुळे मानवजातीचे जसे कल्याण झाले, तसे भयंकर उत्पात घडले, हेही खोटे नाही. धर्मामुळे अनेक परोपकारी संस्था निर्माण झाल्या. शांती आणि प्रेम यांची स्थापना करण्याकरिता धर्माइतकी धडपड दुसऱ्या कोणत्याही संस्थेने केली नाही; पण भयंकर द्वेषाचे बीजारोपणही धर्मानेच केले. सर्व मनुष्यात बंधुत्वाचे नाते आहे, हे तत्त्व धर्माने जितक्या उच्च घोषाने सांगितले, तितके दुसरे कोणत्याही संस्थेने सांगितले नाही; पण मनुष्यामनुष्यात भयंकर शत्रुभावही धर्मानेच निर्माण केला आहे. जनावरांसाठी धर्माने दवाखाने बांधले; पण रक्ताचे पाटही वाहविले. अशा परिस्थितीतही धर्मात तत्त्ववेत्ते आणि विचारी पुरुष निर्माण झाले. धर्माची परस्पर



तुलना करून, त्याचा सांगोपांग अभ्यास त्यांनी केला आणि त्यांच्यातील विरोध नाहीसा करण्याची खटपटही त्यांनी केली. निरनिराळ्या धर्मांची नि पंथांची एकवाक्यता होऊन एकंदरीने मनुष्यजातीतील एकोपा वाढावा, अशी खटपट पूर्वी पुष्कळ वेळा झाली नि आजही ती सुरू आहे.

धर्माच्या बाबतीत सर्वांचे मतैक्य होणे अत्यंत दुरापास्त आहे. तथापि, या बाबतीत अगदीच निराश व्हायला पाहिजे, असे नाही. सर्वांचे मतैक्य ज्यात होईल, अशीही तत्त्वे येथे आहेत. आपण सारे मनुष्यप्राणी आहोत; तथापि आपणां सर्वांचे स्वरूप सारखेच आहे काय? आपली मनोघटना एकसारखी आहे काय? वैषम्य आम्हीच निर्माण केले. तरीही समतेचे तत्त्व आपल्या अंत:करणास प्रिय आहे, हेही खोटे नाही. विविधतेमागे ऐक्य या तत्त्वावर साऱ्या विश्वाची उभारणी झालेली आहे. सर्व विश्वाचे एकीकृत अथवा समष्टिरूप अस्तित्व म्हणजे परमेश्वर. त्याच्या ठिकाणी सर्व विश्व एकरूप होते. त्याच्या स्वरूपात आपण सारे एकरूप आहोत. तथापि, व्यक्त अथवा स्पष्टदशेत हे सारे भेद अवश्य राहणारच. याकरिता विश्वव्यापी धर्म या शब्दाचा अर्थ सर्वांचा विश्वास एकाच मतावर असणे, असा आपण करू. विविधता हे जगाच्या अस्तित्वाचे आदितत्त्व आहे, हे सत्य आहे.

## स्त्रियांसाठी स्वतंत्र मठ

स्वामीजींनी स्त्रियांसाठी स्वतंत्र मठ स्थापन करण्याचे ठरवले. गंगेच्या पूर्वकिनाऱ्यावरच्या या मठात ब्रह्मचारी व संन्याशाप्रमाणे ब्रह्मचारिणी आणि साध्वी तयार करायच्या. स्त्रियांचे सारे हक्क ‘मनुस्मृती’सारख्या धर्मग्रंथाने हिरावून घेतले, त्यांना केवळ प्रजोत्पादक यंत्रात रूपांतरित केले. या जगन्मातांना दुसरा मार्ग नाही? उपनिषदात काली, गार्गी, मैत्रेयीसारख्या स्त्रिया ऋषिमुनींबरोबर ब्रह्मचर्चा करीत. हजारो वेदज्ञ ब्राह्मणांसमोर गार्गीने याज्ञवल्क्याबरोबर वादविवाद केला. तिच्या चर्चेचा विषय ब्रह्म हा होता. काही मोजक्या स्त्रियांना जर ब्रह्मज्ञान प्राप्त करून घेण्याचा अधिकार असेल, तर तो साऱ्या स्त्रियांनाही का असू नये?

तसेच, प्राचीन काळी जर स्त्रियांना असा अधिकार होता, तर तो आता का असू नये? जी गोष्ट पूर्वी घडून गेली, ती आता पुन्हा घडण्यास काय प्रत्यवाय आहे? इतिहासाची पुनरावृत्ती होत असते. स्त्रियांचा योग्य सन्मान राखूनच इतर

राष्ट्रे आज महत्पदास चढली आहेत. जेथे स्त्रियांबद्दल कसलाही आदर नव्हता, अशी राष्ट्रे पूर्वी कधी मोठेपणास चढली नाहीत. यासाठीच एक आदर्श मठ स्त्रियांसाठी स्थापण्याचा निर्णय स्वामीजींनी घेतला. धार्मिक जीवन, स्वार्थत्याग आणि आत्मसंयमन या तीन गोष्टींचे पालन या मठातील विद्यार्थिनींनी अवश्य केले पाहिजे. जन्मभर त्यांनी सेवाधर्म पाळला पाहिजे.

पूजाविधीचे कर्मकांड स्वामीजींना मान्य नसल्याने बेलूरच्या मठात पूजापाठांऐवजी शास्त्रग्रंथांच्या अभ्यासावर अधिक वेळ घालविण्यास ते शिष्यांना बजावीत. अशा कामासाठी मठात ठरावीक वेळा घंटा वाजत असे. चारित्र्यसंपन्न होण्यासाठी, वैराग्य, शिक्षण व संस्कृतीच्या संवर्धनासाठी सतत कार्यमग्न राहा, तरच तुमच्यामध्ये सामाजिक पुनरुत्थानाचे काम करण्यासाठी आवश्यक असे चैतन्य व उत्साह टिकून राहील, असे स्वामीजींनी सांगितले. आपला ३९वा शेवटचा वाढदिवस त्यांनी बुद्धगयेला साजरा केला.

दिवसेंदिवस त्यांची प्रकृती बिघडत होती. जूनच्या शेवटी शेवटी त्यांनी जाहीरच केले की, आता महानिर्वाणाची तपस्या सुरू करावयाची आहे. मठाच्या परिसरात फिरता फिरता गंगेच्या काठावर आपल्या मर्त्य देहावर कोठे अग्निसंस्कार करावेत याबाबत योग्य त्या सूचना देऊन त्यांनी आपल्या अग्निसंस्काराच्या ठिकाणी फोटो, मूर्ती काही न ठेवता, फक्त ॐ कोरावा, अशी इच्छा प्रगट केली.

शेवटच्या आठवड्यात आपल्या तरुण शिष्यांना ते म्हणाले, ''तुमचे कर्तव्य म्हणजे गरिबांची सेवा करणे आणि रंजल्या गांजलेल्यांना आपले म्हणणे. त्यात जातपात, धर्मपंथ असले भेद ठेवायचे नाहीत. एक वेळ वेदान्ताचा अभ्यास आणि ध्यानधारणेचा अभ्यास आणि अशीच काही कामे तुम्ही पुढच्या जन्मासाठी ठेवून द्या. हा देह इतरांच्या सेवेसाठी वेचला जाऊ दे. इतक्या वर्षांच्या तपश्चर्येनंतर मला कळले की, सर्वांत मोठे सत्य म्हणजे तोच सर्वांतर्यामी आहे. त्याचीच ही सारी बहुविध रूपे आहेत. वेगळा देव शोधायची गरज नाही. अस्पृश्यता फेकून द्या. या शृंखला तोडा. प्राणिमात्रांची सेवा म्हणजेच ईश्वर पूजा.''

## शेवटचा दिवस

शुक्रवार दि. ४ जुलै, १९०२. आज पहाटे स्वामी विवेकानंद लवकर उठले. सर्वांबरोबर एकत्र ध्यान करायला गेले. मठाच्या आग्नेय कोपऱ्यातील



प्रशस्त खोलीत स्वामीजी राहात. ध्यानाहून परतल्यावर जुन्या आठवणी काढून त्यात रमून गेले. थोडा चहा घेतला नि मठाच्या मंदिरात गेले. सारी दारे, साऱ्या खिडक्या आतून बंद केल्या. तीन तास जगन्मातेच्या सानिध्यात घालवले. जगदंबेचे एक गीत गाऊन झाल्यावर हळूहळू मंदिरातून बाहेर आले. पायऱ्या उतरताना 'मन चल निजनिकेतन' हे गाणे गुणगुणत मठाच्या आवारात फिरू लागले. ज्या दिवशी रामकृष्ण आणि नरेंद्रांची पहिली भेट झाली, त्या वेळी कालीमंदिरात त्यांनी हेच गीत म्हटले होते. 'मना चल तू तुझ्या मूळ घराकडे, मूळ निवासस्थानाकडे चल' स्वामीजींनी दुपारी साऱ्यांबरोबर भोजन घेऊन, थोडी विश्रांती घेतली. रोज तीन वाजता वर्ग घ्यायचे असत. आज सव्वाही वाजायचा होता, तोवरच स्वामीजींनी लघुकौमुदी शिकवणे सुरू केले. विषय नीरस असूनही कुणालाही तीन तास कंटाळा आला नाही. नंतर थकवा आल्याने स्वामीजींनी विश्रांती घेतली.

अमावस्येची आदली रात्र. स्वामीजी आपल्या खोलीत आले. खिडकीतून दक्षिणेश्वर काली मंदिराची शिखरे दिसत होती. जपमाळ घेऊन स्वामीजींनी तासभर जप केला. आसनावरून उठून अंथरूणावर झोपले. रात्रीचे आठ वाजले. तास निघून गेला. जपाची माळ तशीच होती. हात कंपायमान झाला. त्यांनी दीर्घ श्वास घेतला. मस्तक उशीवरून खाली घसरले. नजर भ्रूमध्यावर स्थिर होती. त्यांनी महासमाधी घेतली.

स्वामीजींच्या कुटुंबीयांना ही दुःखद वार्ता समजली. बंधू भूपेंद्रनाथ आणि माता भुवनेश्वरी मठात आल्या. ''इतक्या लहान वयात नरेंद्र कसा गेला? त्याच्यावर चांगले उपचार झाले नाहीत का?'' असे विचारून ती माउली धाय मोकलून रडू लागली. सनातनी गुरुबंधूंनी टांगा बोलवून त्यांना घरी पाठवले. भगिनी निवेदितांनी जाब विचारला, ''त्यांच्या मातेला तडकाफडकी का परत पाठवलेत?'' यावर उत्तर मिळाले, ''संन्याशी मेला की कोणी रडायचे नाही, असे शास्त्रवचन आहे.''

विवेकानंद नावाचे चक्रीवादळ शांत झाले. गंगा सागराला मिळाली. शिवाचा अंश शिवमय बनला होता. त्या वेळी स्वामी विवेकानंद फक्त ३९ वर्षे ६ महिन्यांचे होते.

◆

# स्वामी विवेकानंदांचे बंधू डॉ. भूपेंद्रनाथ दत्त



स्वामी विवेकानंदांचे धाकटे बंधू डॉ. भूपेंद्रनाथ दत्त हे बंगालमधले जहाल क्रांतिकारक, स्वातंत्र्यसेनानी. ब्रिटिशांनी त्यांना सक्तमजुरीची शिक्षा दिली. त्यानंतर ते अमेरिकेला गेले. ग्रीस, तुर्कस्तान येथे त्यांनी भारतीय तरुणांची सशस्त्र सेना तयार केली. पहिले महायुद्ध सुरू झाल्यावर ते जर्मनीला गेले. तेथल्या विद्यापीठात अँथ्रोपॉलॉजी विषयातील डॉक्टरेट मिळविली. त्यांचा लेनिन यांच्याशी पत्रव्यवहार होता. लेनिनने त्यांना भारतातील शेतकरी व कामगार चळवळीशी संपर्क साधण्यास सांगितले. हाच वर्ग स्वातंत्र्यचळवळीचा आधारस्तंभ आहे, हे त्यांना कळले. भारतात परतल्यावर त्यांनी त्या दिशेने काम केले. नेहरू, नेताजी सुभाषचंद्र बोस, अरविंद घोष यांच्याबरोबर काम केले. त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले. ४ सप्टेंबर १९६१ रोजी हा स्वातंत्र्यसेनानी वारला. थोडा दुर्लक्षितच...

बोस्टनमध्ये प्रोफेसर जॉन हेन्री राईट आणि त्यांची पत्नी मेरी तपन राईट यांनी स्वामी विवेकानंदांना १८९३मध्ये घरी निमंत्रित केले. अचानक पार्लमेंट ऑफ रिलिजनने सप्टेंबरमध्ये परिषद घेण्याचे जाहीर केले नि शिकागो येथल्या महागड्या राहणीमानाचा खर्च झेपेना म्हणून स्वामीजी बोस्टनला आले. प्रो. राईट यांनी स्वामीजींची योग्यता जाणली नि संयोजकांना पत्र लिहिले की, या व्यक्तीची बुद्धिमत्ता आम्हां साऱ्या प्राध्यापकांची बुद्धी एकत्र केली, तरी जास्त होईल. त्यांना ओळख विचारणे म्हणजे सूर्याला त्याची ओळख विचारण्यासारखे आहे.

पार्लमेंट भरण्यापूर्वी बोस्टनमध्ये स्वामीजींच्या भोवती अनेक चाहतावर्ग जमत असे. त्यात काही ब्रिटिशर्सही होते. एके दिवशी स्वामीजींची भाषा स्फोटक बनली. त्यांनी इंग्रजांच्या भारतीयांवरील अत्याचारांबद्दल कडक शब्दांत



प्रतिक्रिया व्यक्त केली. २५ ऑगस्ट, १८९३चा दिवस. नेहमीचे शांत, प्रेमळ स्वभावाचे स्वामीजींचे हृदय त्यांच्या देशबांधवांच्या शोषणाने दुःखीकष्टी झाले होते. त्याला कारण होते, इंग्रजांचे पारतंत्र्य. भारताच्या अवनतीला ब्रिटिश कारणीभूत आहेत म्हणून त्यांचा क्रोध शब्दाशब्दांतून प्रगट होत होता. ब्रिटिशांच्या चांगल्या गुणांचे ते कौतुक करीत; पण जागतिक इतिहासाचा त्यांचा अभ्यास सखोल होता. त्यामुळे त्यांनी ब्रिटिशांच्या रानटीपणाचे जे वर्णन केले, ते कोणी खोडू शकले नाही. ते म्हणाले, "Ah, the English, only just a little while ago they were savages. Most Horrible ! Even Now, they are barely emerging from Barbarism."

''कोठे गेला इंग्रजांचा धर्म? ते पवित्र पित्याचे नाव घेतात. शेजाऱ्यावर प्रेम करा, असे ख्रिश्चन धर्म शिकवतो. त्यांच्या राजसत्तेच्या लोभाने त्यांना सुधारले, त्यांच्या देवाने नव्हे. त्यांच्या ओठावर प्रेम शब्द आहे; पण हृदय हिंसा व क्रौर्याने भरले आहे. त्यांचे हात रक्ताने लाल झाले आहेत; पण लवकरच त्यांच्यावर आकाशातून देवाचा निर्णय कोसळेल. देवाची अवकृपा त्यांच्यावर लवकरच कोसळेल. चीन त्यांच्यापेक्षा सामर्थ्यशील बनेल. इंग्रजांनी भारत सोडला की चीन तेथे आक्रमण करेल. रशिया बलाढ्य बनेल.''

स्वामी विवेकानंद भारत आणि स्वातंत्र्याबद्दल बोलत. अनेक कथा सांगत, झाशीच्या राणीविषयी त्यांना खूप आदर होता. ते सांगत असताना प्रो. राईट यांचा छोटा मुलगा ऑस्टीन हे नीट लक्ष देऊन ऐकायचा. १९३१ साली त्याचे अकाली निधन झाले. मृत्यूपूर्वी तेवीसशे पानांची कादंबरी त्याने लिहिली होती. त्याचे नाव Islandia. १९४२ साली ती संक्षिप्त स्वरूपात प्रसिद्ध झाली आणि जगप्रसिद्ध बनली. त्यातली वर्णने म्हणजे स्वामीजींची व्याख्याने आहेत. त्यातील लोक भारतीय आहेत, तर हिरॉईन झाशीची राणी आहे. या काल्पनिक जगतावर स्वामीजींच्या विचारांचा गहिरा प्रभाव आहे.

स्वामी विवेकानंद म्हणजे पूर्वाश्रमीचे नरेंद्र विश्वनाथ दत्त. त्यांचे वडील कोलकाता हायकोर्टात ॲटर्नी होते. नरेंद्र यांनी कायद्याची पदवी घेतली होती. इंग्लंडला जाऊन उच्चशिक्षण घेण्याचीही त्यांनी तयारी केली होती. त्यांना महेंद्रनाथ व भूपेंद्रनाथ, असे दोन बंधू होते.

भूपेंद्रनाथ हे क्रांतिकारक व जहाल स्वातंत्र्यसैनिक होते. त्यांचा जन्म ४

सप्टेंबर, १८८० रोजी झाला. महेंद्रनाथ थोर बंगाली लेखक, विचारवंत म्हणून प्रसिद्ध होते. भूपेंद्रनाथ केवळ चार वर्षांचे असतानाच त्यांच्या वडिलांचे हृदयविकाराने निधन जाले. नरेंद्र सर्वस्वाचा त्याग करून संन्याशी बनले. त्यामुळे श्रीमंत कुटुंबांचे दुर्दैवी दिवस सुरू झाले.

बालपणी स्वामी विवेकानंदांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर होता; पण पुढे त्यांना समजले की, राष्ट्रीय प्रश्नांकडे पाहताना धार्मिक दृष्टिकोन बाळगला, तर अधिक गोंधळ निर्माण होतो. ब्राह्मो समाजाचे विचार त्यांनी स्वीकारले. अर्थात, विवेकानंदाचे राष्ट्रप्रेम हा त्यांचा आयुष्यभर स्फूर्तिस्रोत राहिला. म्हणून ते नेहमी म्हणत की, स्वामी विवेकानंद म्हणजे देशप्रेमी प्रेषित, Patritic prophet.

लवकरच भूपेंद्रनाथ सशस्त्र देशभक्तांच्या गटात सामील झाले. अनुशीलन समितीची १९०१ला स्थापना झाली. पी.मित्रांच्या नेतृत्वाखाली हा गट कार्यरत बनला. त्यात चित्तरंजन दास, जितेंद्रनाथ बंदोपाध्याय, सुरेंद्रनाथ टागोर, सखाराम गणेश देऊसकर, सतीशचंद्र बसू, अरविंद घोष (नंतरचे महर्षी अरविंद), कोलकात्यात ३ अपर सर्क्युलर रोडवर ते एका व्यायामशाळेत जमत. वयाच्या २२व्या वर्षी भूपेंद्रनाथ व त्यांच्या सहकाऱ्यांनी शस्त्रे चालवण्याचे शिक्षण घेतले. मॅझिनी व गॅरिबाल्डी हे क्रांतिकारक त्यांचे आदर्श बनले. चारित्र्यसंपन्नता, दुर्दम्य उत्साह, अचाट धाडस व स्वातंत्र्याची ऊर्मीही या तरुणात होती. ही मूल्ये भूपेंद्रनाथांनी आयुष्यभर जोपासली.

पंडित शिवराम शास्त्रींची एक कादंबरी प्रसिद्ध झाली होती. त्यावरून युगांतर हे नाव घेऊन भूपेंद्रनाथाांनी साप्ताहिक सुरू केले. त्याद्वारे देशभर सशस्त्र क्रांतीच्या ज्वाला पसरल्या. भूपेंद्रनाथांनी सोनार बांगला नावाचे जहाल निवेदन प्रसिद्ध केले. बंगालच्या फाळणीच्या वेळी हे निवेदन भारतभर गाजले.

युगांतराचे संपादक म्हणून त्यांनी आठवड्यामागून आठवडे सातत्याने लिखाण केले. १९०७ साली ब्रिटिशांनी त्यांना सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली. त्यांनी स्वत: कोर्टात युक्तिवाद केला. ब्रिटिशांनी आम्हांला सक्तीने पारतंत्र्यात ठेवले आहे. तसा त्यांना अधिकार नाही. त्यांना माझ्याकडून स्पष्टीकरण मागण्याचा काहीही अधिकार नाही. देशावर प्रेम करणारा मी देशभक्त आहे. मी जे लिहिले आहे, त्याचे मी सर्वार्थाने समर्थन करतो (संजीवनी २३ जुलै १९०७). पण,



ब्रिटिशांनी त्यांना शिक्षा दिली. त्या दिवशी भगिनी निवेदितांनी एका पत्रात लिहिले. "B has done us proud today."

ज्या दिवशी तुरुंगातून सुटका झाली, त्याच दिवशी भगिनी निवेदिता आणि इतरांनी त्यांना अमेरिकेला पाठवले. ब्रिटिश त्यांना पुन्हा पकडून फाशीचा बेत आखत होते.

अमेरिकेत उच्चशिक्षणाबरोबरच क्रांतिकारी कामेही चालूच होती. मिनिसोटा विद्यापीठात डॉक्टरेट करताना कॅलिफोर्नियात भारतीय जहाल तरुणांची त्यांनी बैठक घेतली. १९१४ला त्यांनी अमेरिका सोडली. सशस्त्र लढ्याची त्यांनी योजना आखली. ते ग्रीसला आले. तेथून त्यांचा एक सहकारी गुप्तपणे भारतात आला व परिस्थितीचा आढावा घेऊ लागला; पण ब्रिटिशांनी त्याला पकडले व तुरुंगात टाकले. त्यामुळे भूपेंद्रनाथांनी आपला बेत पुढे ढकलला. त्यांच्या पद्धतीनेच पुढे सुभाषचंद्र बोसांनी कार्य केले. भूपेंद्रनाथांच्या हिंदी सेनेला तुर्कस्तान सरकारने पाठिंबा दिला होता. १९१४साली महायुद्ध सुरू झाले. तुर्कस्तानच अडचणीत आले. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्यसैनिकांना आपले ठिकाण बदलावे लागले.

त्या काळात जर्मनीमध्ये बिरेंद्रनाथ चट्टोपाध्याय काम करीत होते. त्यांनी भारतीय स्वातंत्र्य कमिटी स्थापन केली होती. भूपेंद्रनाथ जर्मनीला गेले व त्यांना सामील झाले. पुढे ते त्याचे अध्यक्ष बनले. बर्लिन कमिटीच्या ठरावात असे म्हटले आहे की, स्वतंत्र भारत हा समाजवादी प्रजासत्ताक Socialist Republic असेल. स्वामी विवेकानंदांनी स्वत:ला समाजवादी म्हणून संबोधले होते. त्याचा गहिरा प्रभाव भूपेंद्रनाथांवर पडला. ट्रॉटस्कीच्या भाषणाने १९१७ साली ते प्रभावित झाले. त्यांना १९२३ साली अँथ्रोपॉलॉजी विषयात बर्लिन विद्यापीठाची डॉक्टरेट मिळाली. जर्मन, पॅरिस, एशियाटिक अँथ्रोपॉलॉजी सोसायटीचे ते सदस्य बनले. मॉस्कोतील कम्युनिस्ट जागतिक संमेलनाला ते पोहचू शकले नाहीत; मात्र १९२१ला ते तेथे गेले. Communist Revolution - Final solution of the problem हा त्यांचा प्रबंध त्यांनी लेनिनला सादर केला. तो वाचून लेनिन प्रभावित झाले. त्यांनी त्यांना सांगितले भारतात शेतकऱ्यांच्या चळवळी करणाऱ्या संस्थेच्या संपर्कात राहा. या छोट्याशा पत्राने डॉ. भूपेंद्रनाथांचा स्वातंत्र्यसंग्रामाकडे पाहण्याचा दृष्टिकोन पार बदलून गेला. भारतातले शेतकरी

हा भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्याची प्रमुख ताकद आहे, हे त्यांना नव्याने समजले. १९२२ला त्यांनी भारतातल्या आपल्या जहाल क्रांतिकारक सहकाऱ्यांना लिहिले की, सशस्त्र क्रांतीचा मार्ग सोडून शेतकरी-कामगार चळवळीकडे, सामूहिक उठावाकडे, जागृतीकडे लक्ष द्या.

डॉ. भूपेंद्रनाथ भारतात परतले. त्यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस, जवाहरलाल नेहरू यांच्याबरोबर अनेक सभांतून भाग घेतला. १९३०च्या काँग्रेसच्या अधिवेशनात भारतीय शेतकरी व कामगारांच्या उद्धाराविषयी त्यांनी मसुदा तयार केला.

१९२६ ते १९४१ या कालावधीत भूपेंद्रनाथ दत्त विविध स्वातंत्र्यसमित्यांत पदाधिकारी म्हणून कार्यरत राहिले. १९४१ला कोलकात्यात नाझींच्या रशियावरील आक्रमणाचा निषेध करणारी प्रचंड सभा झाली. त्या वेळी प्रमुख भाषणात डॉ. भूपेंद्रनाथ यांनी स्पष्ट केले की, समाजवादाला पाठिंबा देऊन फॅसिझमचा विरोध करणे भारताच्या हिताचे आहे; म्हणून रशियाला भारताने पाठिंबा द्यायला हवा.

डॉ. भूपेंद्रनाथ २५ डिसेंबर, १९६१ रोजी चिल-पेनुरी येथे वारले. त्यांची विद्वत्ता अफाट होती. त्यांनी विविध विषयांवर १०-१२ ग्रंथ लिहिले; पण त्यांच्या स्वातंत्र्यलढ्याची, या विद्वत्तेची कदर स्वतंत्र भारतात कधी झालीच नाही. हा स्वातंत्र्ययोद्धा एकाकी अनंतात विलीन झाला.

◆